माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार**

तक्रार क्रमांक -१८६+१८७+१८९/२०१८ पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| वैशाली दिपक बाफना | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण पुणे विभाग, १७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळासमोर,पुणे ४११ ००१ |

**(निर्णय दिनांक- ०८/०१/२०२५)**

तक्रारदार यांनी दिनांक २९/११/२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तीन तक्रार अर्ज दाखल केले आहे.

आयोगाने खालील तीन व्दितीय अपील सुनावणी अंती निर्णय पारित केले आहे.

१. व्दितीय अपील क्रमांक - ४७१४/२०१४/पुणे यामध्ये आदेश पारित दि. १७/०६/२०१६ रोजी
२. व्दितीय अपील क्रमांक - ४७१२/२०१४/पुणे यामध्ये आदेश पारित दि. ०३/०५/२०१६ रोजी
३. व्दितीय अपील क्रमांक -४४५७/२०१५/ पुणे यामध्ये आदेश पारित दि ३०/०१/२०१७ रोजी

तथापि सदर आदेशानुसार माहिती मिळाली नाही, अशी तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद तीन द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी. सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह तक्रारदार यांचे तीन तक्रार अर्ज अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-१८६+१८७+१८९/२०१८ /पुणे / 6756/2025 दिनांक 8/1/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG